# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ११०-२२** **दिनांक :- १९/०४/२०२२**

## रुपेश ऑर्केस्ट्रा बार आणि रेस्टॉरन्ट आस्थापनेवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक १६.०४.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. पाटील यांना त्यांचे विश्वसनीय बातमीदाराकडुन अशी माहीती मिळाली की, रुपेश ऑर्केस्ट्रा बार आणि रेस्टॉरन्ट, किर्ती इस्टेट बिल्डींग, गाळा नं. २७, पहिला माळा, भाईंदर पूर्व या बार आस्थापनामध्ये महिला सिंगर नृत्य करीत असून सदर आस्थापनाचे चालक/मालक, मॅनेजर, कॅशिअर व वेटर असे मुलींना नृत्य करण्यास प्रोत्साहन देत आहेत.

मिळालेल्या माहीतीच्या अनुषंगाने वपोनि/पाटील यांनी पंटर व पंच यांना पाठवून सत्यता पडताळुन रुपेश ऑर्केस्ट्रा बार आणि रेस्टॉरन्ट, भाईंदर पूर्व येथे दिनांक १६/०४/२०२२ रोजी २२.५० वा. छापा टाकला असता रुपेश ऑर्केस्ट्रा बार आणि रेस्टॉरन्ट या बार आस्थापनेमध्ये गाण्याच्या व वाद्याच्या तालावरती महिला सिंगर नृत्य व अश्लिल नृत्य करीत असल्याचे निदर्शनास आले. तसेच बारचे चालक/मालक, व्यवस्थापक, कॅशियर व वेटर हे बारमधील महिला सिंगर यांना नृत्य व अश्लिल नृत्य करण्यास बंदी असताना नृत्य करण्यास भाग पाडुन प्रोत्साहित करीत असताना मिळुन आल्याने बार आस्थापनाचे व्यवस्थापक, कॅशियर, १० वेटर व चालक/मालक यांना ताब्यात घेण्यात आले. सदर कारवाई दरम्यान २६,५२०/- रु रक्कम जप्त करण्यात आली असून सदर बाबत मपोहवा/०३०१५ वैष्णवी यंबर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. ३०१/२०२२ महाराष्ट्र हॉटेल, उपहारगृहे आणि मद्यपानकक्ष (बाररुम) यामधील नृत्य व अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणा-या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम -२०१६ चे कलम ३, ८ (१)(२) प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि. श्री. संपतराव पाटील, सफौ/उमेश पाटील, सफौ/विजय निलंगे, सफौ/रामचंद्र पाटील, पोशि/१२११८ केशव शिंदे व मपोहवा/०३०१५ वैष्णवी यंबर सर्व नेमणूक-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.